महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र. ७३e२ दि.- ७/२/१e

## अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.

**दिनांक - ०६/०२/२०१९** **दिनांक - दुपारी ०३.३० वा.**

**स्थळ** - महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

प्रति,
**श्री.योगेश रत्नाकर वांद्रे**
४१०, चंदन सोसायटी, पहिला मजला,
सहकानगर-१, पुणे ४११००९. } **अपिलार्थी**

**श्री. मु.म.शेख**
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका. } **जनमाहिती अधिकारी तथा** उप अभियंता

**माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल**

श्री. योगेश रत्नाकर वांद्रे (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा माहिती अधिकारातील दिनांक ११/१२/२०१८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता , महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) यांना दिनांक ११/१२/२०१८ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी बिबवेवाडी गावठाणातील रस्त्याच्या कमाबाबतची माहिती विचारलेली होती

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| **अर्जाचा दिनांक** | **अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक** | **माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक** | **अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक** | **विलंब दिवस** |
| ११/१२/२०१८ | ११/१२/२०१८ | ०९/०१/२०१९ | १६/०१/२०१९ | १५ दिवस |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती न दिल्याने त्यांचा अपिल अर्ज दिनांक ०९/०१/२०१९ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झाला.

| अपिल अर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| **अपिल अर्जाचा दिनांक** | **अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक** | **अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक** |
| ०९/०१/२०१९ | ०९/०१/२०१९ | अपिल अर्ज मुदतीत आहे. |

| | | |
|---|---|---|
| प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ | - | दि.०६/०२/२०१९ रोजी दुपारी ०३.३० वा. |
| सुनावणीस अपिलकर्ता | - | उपस्थित |
| सुनावणीस जनमाहिती अधिकारी | - | उपस्थित |
| सुनावणीस सहा.जनमाहिती अधिकारी | - | उपस्थित |

**जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील -**

| **क्र.** | **माहितीचे वर्णन** | **तपशील** |
|---|---|---|
| मुद्दा क्र.१ | सोबत जोडलेल्या कच्च्या नकाशात हॅचिंग केलेल्या बिबवेवाडी गावठाणातील रस्त्याच झालेल्या, सध्या अस्तित्वात असलेल्या कॉंक्रीटीकरणाची कामाची संपूर्ण फाईल बघायला मिळावी. | माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये आपण बिबवेवाडी गावठाणात झालेल्या रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणाबाबतची माहितीची मागणी केलेली आहे. सदर माहिती सन व टेंडर क्रमांक नसल्याने माहिती शोधणे अडचणीचे होत आहे. तरी सदर कामाचे नाव, टे.क्र. व सन कळविल्यास माहिती निश्चीत संकलित करून आपणास कळविण्यात येईल. |

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक ०६/०२/२०१९ रोजी दुपारी ०३.३० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.योगेश र.वांद्रे हे उपस्थित होते. सदर दिनांकास श्री.मु.म.शेख जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता , महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. तसेच सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता श्रीमती प्रज्ञा कोडापे व श्री.पंकज अंबे हे उपस्थित होते.

अपिलार्थी श्री.योगेश र.वांद्रे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जाची माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपिल अर्ज दाखल केलेला आहे.

जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहितीची हि मोघम स्वरूपाची असून तरीही त्या आधारे अपिलार्थी यांच्या माहिती अधिकार अर्जात नमूद मुद्यांच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध प्रकरणांची अपिलार्थींच्या समक्ष पाहणी केली असता, माहिती अधिकार अर्जात नमूद बाबींनुसार माहिती संकलित करून देणे शक्य नाही. तरीही कार्यालयातील उपलब्ध दप्तराची पाहणी करून अपिलार्थीस या कार्यालयाकडील जा.क्र.६६४८ दि.१६/०१/१९ अन्वये माहिती शोधणे अडचणीचे होत असल्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच अपिलार्थीने विशिष्ट स्वरूपाच्या माहितीची मागणी केल्यास त्यांना आवश्यक असणारी माहिती उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे विवेचन केलेले आहे.

वरीलप्रमाणे संबंधित अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी, सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

**अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले 'आदेश'**

- जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी केलेले विवेचन हे अपिलार्थीस तत्वत: मान्य असल्याने अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अर्जाच्या अनुषंगाने विशिष्ट स्वरूपाच्या माहितीची मागणी केल्यास, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालयाकडे उपलब्ध असणारी माहिती त्वरीत उपलब्ध करून द्यावी. तसेच यापुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जांची परिपूर्ण स्वरूपातील माहिती जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास विहित मुदतीत उपलब्ध करून देणेची दक्षता घ्यावी.

कळावे,

7.02.19

(अविनाश सकपाळ)
**अपिलीय अधिकारी** तथा
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका.

टिप –

१. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे – ४११००१ यांचेकड व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत –

१. श्री.योगेश र. वांद्रे, ४१०, चंदन सोसायटी, सहकानगर, १ला मजला, पुणे ४११००९.

२. श्री.मु.म.शेख जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता , महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.

३. श्रीमती प्रज्ञा कोडापे सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.